# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/01/2023 (बुधवार) दुपार

---

## गैरकायदयाची मंडळी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. उमरेड**:— अंतर्गत मौजा वायगाव घोटुर्ली मिरा मारोती कॉम्प्लेक्स ता. उमरेड जि. नागपूर येथे दिनांक १०/०१/२०२३ चे १४.१५ ते १४.४० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— सौरभ अरुण सिंग, वय २३ वर्ष, रा. प्लॉट नं. ५ वायगाव घोटुर्ली ता. उमरेड हा आपले वडीलांचे ट्रान्सपोर्टींग बिलाचे पेंडींगबाबत खान ट्रांन्सपोर्टचे ऑफिस मध्ये मित्रासह जावुन खान ट्रान्सपोर्टचा मालक नामे— आदिल खान यास बिलाचे करेक्शनबाबत विचारपूस केली असता नमुद आरोपी क्र. १) आदिल बादशाह खान, वय ३४ वर्ष, रा. वायगाव घोटुर्ली ता. उमरेड जि. नागपूर याने ''तु माझे ऑफिस मध्ये कसा आला तु माझे ऑफिसमधुन निघ'' असे म्हणुन २) रझाक शेख, ३) रफिक शेख, ४) मनोज बैस, ५) आदील खान आफिस मधील दोन संगणक चालवणारे मुले या आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादी व त्याचे भाऊ तसेच त्याचे मित्रास हाथबुक्याने मारहाण करुन शिवीगाळ केली व ''मी तुम्हाला फसवुन टाकीन'' अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीतांविरुद्ध कलम १४३, १४७, ३२३, ५०४, ५०६ भादवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राजु डोर्लीकर पोस्टे उमरेड मो. नं. ८७६७२३४५०१ हे करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. कळमेश्वर** :— दिनांक ०१/०१/२०२३ चे १३.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी नामे— विक्की नथ्थूजी देवके, वय ३० वर्ष, रा. आकाश नगर कळमेश्वर याचे गेल्या पाच वर्षा पासुन प्रेमसंमध होते. आरोपी याने लग्नाला नकार दिल्याने फिर्यादीचे लग्न जुळले असता आरोपी याने लग्न तोडले घटना वेळी व ठिकाणी यातील नमूद आरोपी याने फिर्यादीचा पाठलाग करून फिर्यादीची इच्छा नसतांना ''माझे सोबत लग्न कर'' असे म्हणुन विनयभंग करून ''लग्न केले नाही तर तुला खोटया गुन्हयात फसविन'' असे म्हणुन आत्महत्या करील अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ (ड) (१), ५०६ भादंवि कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास ग्रेड पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र पाली मो. क्र. ९२८४३५४६३० हे करीत आहे.

.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**